थ) वरील क, ख, ग, छ, ज, झ, याबाबतच्या पुराव्यांच्या प्रती राजपत्रीत अधिका-यांनी साक्षांकित केलेल्या असाव्यात.

**सर्व प्राप्त अर्जांमधुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना सर्वोच्च प्रधान्याने परवाने मंजूर करण्यात येतील व उर्वरित परवान्यांच्या वाटपासाठी पात्र अर्जदाराची यादी करण्यात येईल.**

न) करारामध्ये नमुद करण्यात आलेल्या कमाल फे-या पेक्षा अर्जदारानी मागीतलेल्या फे-याची संख्या कमी असल्यास अशा सर्व पात्र अर्जदारांना त्यांनी मागणीनुसार परवाना मंजूरी पत्र जारी करण्यात येईल.

ट) ज्या अर्जदारांना परवाना जारी करण्यात येईल त्यांनी स्वतः परिचलन करणे बंधनकारक राहील. परवाना अन्यव्यक्तीस लिजने / भाडेपट्ट्याने दिल्याचे निदर्शनास आल्यास परवाना रद्द करण्यात येईल.

टीप - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना उपरोल्लेखीत बाब क्र. क, ख, ग, च, छ, ज, झ, त, थ, मधून सूट राहील.

एखाद्या विशिष्ट मार्गासाठी प्राप्त झालेल्या अर्जांतील एकूण फे-यांची संख्या करारानुसार मंजूर असलेल्या व वाटपासाठी शिल्लक असलेल्या फे-यांच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास त्यातील उच्चतम पात्र अर्जदार निवडण्यासाठी अर्जदाराने परवान्यावर दाखल करणा-या वाहनाचे वय, अर्जदाराच्या परिवहन व्यवसायाचा अनुभव, शेक्षणिक पात्रता, आर्थिक स्थिती, ह्या बाबी विचारात घेण्यात येतील त्यास्तव अर्जदारांनी या बाबींबाबत पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. शारिरिकदृष्ट्या अपंग ( अपंगता किमान ५० टक्के), माजी सॅनिक, प्रकल्पग्रस्त, आय टी डी सी / एम टी डी सी चा मान्यताप्राप्त ट्रॅव्हल एजंट या वर्गवारीतील अर्जदारांनी सक्षम प्राधिका-याचा प्रमाणित केलेला दाखला जोडणे आवश्यक आहे.

वरील दोन्ही राज्यांसोबत झालेल्या परस्पर वाहतूक कराराच्या प्रती तसेच परवाने देण्यासाठी उपलब्ध मार्गांची यादी राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी ह्यांच्या कार्यालयामध्ये तसेच परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या कार्यालयामध्ये अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

तद्नुषंगाने, उपरोल्लेखीत करारांमधील आंतराज्यीय मार्गांवर टप्पा वाहतूक करण्यास इच्छुक असलेल्या सर्व वाहतूकदारांना असे सूचित करण्यात येते की त्यांनी आपले अर्ज "पी.एस.टी.एस.ए." ह्या विहित नमुन्यामध्ये परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत,३ /४ था मजला, सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह तसेच शुल्कासह दिनांक ३०.११.२०११ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

अपूर्ण (Incomplete) स्वरूपात दाखल केलेले अर्ज व वरील प्रमाणे परवान्याचे वाटप झाल्यानंतर अतिरिक्त ठरणारे अर्ज विना-सोपस्कार / संक्षिप्तपणे (Summarily) निकालात काढण्यात येतील. अर्जदारांना परवाना नाकारण्यात आल्याचे कळविण्यात येईल व त्यांची सुरक्षा ठेव त्यांना परत करण्यात येईल.

तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**सचिव,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

D:\DESK 1\STA\Minutes\circulations\interstate permit merits letters\3